- प्रसिद्ध कवि व नाटककार श्री. श्रीपाद जोशी चंद्रपूर यांच्या हस्ते मराठी वाङ्मयमंडळाचे उद्घाटन करण्यात आले त्यांनी कविता व नाट्यसादरीकरण यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व विविध आशयांवर काव्य व नाट्य कसे निर्माण होते याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखविले.
- दैवज्ञ भवन रत्नागिरी यांनी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत एकूण पाच विद्यार्थिनीनी भाग घेतला त्यापैकी नेहा सावंत हिने प्रथम व सायली महाडिक हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.
- श्री. विक्रम परांजपे डीकॅड कॉलेज प्राध्यापकांचे कला व साहित्य संबंध या विषयवार व्याख्यान
- तसेच नेहा सावंत या एफ वाय बीएस्सीच्या विद्यार्थिनीच्या कवितेची सावंतवाडी येथील वाचनालयाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेसाठी निवड झाल्याने अंतिम फेरीत सहभाग
- मराठी विभागातर्फे एनएस एस च्या विद्यार्थ्यांना एक महिन्याचे योग परिचय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणात एकूण ३८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.
- मराठी विभागाने मिटकॉन व जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पर्स तयार करण्याचे एक महिन्याचे प्रशिक्षण आयोजित केले. या प्रशिक्षणात महाविद्यालयातील एकूण ३४ विद्यार्थिनीनी सहभाग घेतला.
- दिनांक १५ ऑक्टोबर २०१८ या वाचन प्रेरणा दिनी श्री सद्‌गुरू लोकमान्य वाचनालय देवरुख संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पुस्तक अभिवाचन स्पर्धेत एकूण १६ विद्यार्थी सहभागी झाले.
- दिनांक १२ व १३ ऑक्टोबर रोजी पाचगणी येथे मेहता कॉलेजने आयोजित केलेल्या श्री लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यावरील राष्ट्रीय चर्चासत्रात तीन विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी सहभाग घेतला.
- भिलार येथील पुस्तकांच्या गावाला विद्यार्थ्यांसह भेट दिली.
- दिनांक २७ डिसेम्बर २०१८ एन एस एस. निवासी शिबीर सांदिपनी गुरुकुल येथे 'बोलक्या संवेदना' या विषयावर व्याख्यान